जलयुक्त शिवार अभियान २.०
**राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : जशिअ-२०२२/प्र.क्र.३०२/जल-७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०३ जानेवारी, २०२३

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यात पिकाच्या ऐन वाढीच्या काळात पावसाची अनियमितता व पावसातील खंड यामुळे सतत टंचाई सदृश परिस्थिती निर्माण होऊन त्याचा मोठा परिणाम कृषि क्षेत्रावर होतो. राज्यातील सिंचनाच्या मर्यादित सुविधा, अवर्षण प्रवण क्षेत्राची मोठी व्याप्ती, हलक्या व अवनत जमिनीचे मोठे प्रमाण, अनिश्चित व खंडीत पर्जन्यमान यामुळे कृषि क्षेत्रात वाढत जाणारी अनिश्चितता ह्या बाबी विचारात घेऊन टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ पासून ते सन २०१८-१९ पर्यत राबविण्यात आले.

जलयुक्त शिवार अभियानामध्ये एकात्मिक पध्दतीने ग्रामस्थ, शेतकरी व सर्व संबंधीत विभागाच्या समन्वयाने शिवार फेरी करुन नियोजनबध्दरित्या कृति आराखडा तयार करुन अंमलबजावणी करणे यामुळे हा कार्यक्रम एक लोक चळवळ झाली आहे. विविध मृद व जलसंधारणाचे क्षेत्रीय उपचार व ओघळ नियंत्रण उपचार, जुन्या उपचारांचे बळकटीकरण, आवश्यकतेनुसार दुरुस्ती, गाळ काढणे इत्यादी कामे/उपचार एकूण २२५९३ गावात मोहिम स्वरुपात राबवून त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. यामध्ये ६,३२,८९६ कामे पूर्ण झाली असून २०५४४ गावे जलपरिपूर्ण झाली आहेत. अभियानातंर्गत झालेल्या कामामुळे जवळपास २७ लाख टी.सी.एम. पाणीसाठा क्षमता निर्माण करण्यात येवून सुमारे ३९ लाख हेक्टर शेतीसाठी संरक्षित सिंचनाच्या सुविधा निर्माण करण्यात येऊन कृषि उत्पादकतेमध्ये शाश्वतता आणण्यात आली.

जलयुक्त शिवार अभियानाप्रमाणे जलसंधारणासाठी प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम), नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, आदर्श गाव योजना अशा काही योजना राबविल्या गेल्या. या सर्व योजनांमध्ये समाविष्ट असलेल्या गावांमध्ये झालेल्या कामांची देखभाल दुरुस्ती करणे, मूलस्थानी जलसंधारणाचे उपचार राबविणे, सूक्ष्म सिंचनाचा वापर वाढविणे, पाण्याच्या ताळेबंदाच्या माध्यमातून जलसाक्षरता वाढविणे अशा उपाय योजना हाती घेणे आवश्यक आहे. जेणेकरून या गावांचा शाश्वत विकास होऊ शकेल. तसेच वर नमूद योजनांच्या माध्यमातून ज्या गावांमध्ये जलसंधारणाची कामे झालेली नाहीत अशा उर्वरित गावांमध्ये पाणलोट क्षेत्र विकासाची (टप्पा १ प्रमाणे) कामे हाती घेणे, पावसाचे पाणी अडवून भूजल पातळी संरक्षित करणे, विकेंद्रीत जलसाठे निर्माण करून पिकांसाठी संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करणे, अस्तित्वातील तसेच पाण्याच्या जुन्या संरचनाची देखभाल, दुरूस्ती करून जलस्त्रोतांची साठवण क्षमता पुनर्स्थापित करणे यासाठी ठोस कार्यक्रम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

जलयुक्त शिवार अभियान प्रथम टप्पा तसेच इतर पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम न राबविलेल्या व गाव निवडीच्या निकषानुसार पात्र ठरणाऱ्या गावामध्ये मृद व जलसंधारणाची कामे करणे, जलयुक्त शिवार अभियान प्रथम टप्पा तसेच इतर पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविलेल्या व गावांमध्ये पाण्याची गरज असेल व अडविण्यास अपधाव शिल्लक असेल तेथे पाणलोट विकासाची कामे करणे, जलसाक्षरता द्वारे गावातील पाण्याची उपलब्धता व कार्यक्षम वापर या करीता प्रयत्न करणे, मृद व जलसंधारणाची कामे लोकसहभागातून करणे व उपलब्ध भूजलाच्या माध्यमातून पाणलोट क्षेत्राचा शाश्वत विकास करण्याकरिता **"जलयुक्त शिवार अभियान २.०"** राबविण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर अभियानासाठी मंजूर असलेल्या तरतूदीपैकी ०.२५% रक्कम जलयुक्त शिवार अभियान २.० चे सनियंत्रण करण्यासाठी राखीव ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) जलयुक्त शिवार अभियान लेखाशिर्ष ४४०२ २७८१ या लेखाशिर्षाखाली रुपये ३ लक्ष पेक्षा अधिक रकमेची कामे मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता अशी वर्गवारी विचारात न घेता ई-निविदाद्वारे करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

**२. नविन गावांचा समावेश :-**

२.१ **गाव निवड**

जलयुक्त शिवार अभियान प्रथम टप्पा, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम), नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प व आदर्श गाव व इतर पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम योजनेतंर्गत पुर्ण झालेली तसेच कार्यान्वीत असलेली गावे वगळता उर्वरित गावांपैकी पाणलोट कार्यक्रम अंमलबजावणीसाठी खालील निकषांच्या आधारे गावांची निवड करण्यात यावी.

अ) अवर्षण प्रवण तालुक्यातील गावे.

आ) भूजल सर्व्हेक्षण विभागाकडील पाणलोट प्राधान्यक्रमानुसार गावे (Over Exploited, Critical, Semi Critical)

इ) महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांचे पाणलोट प्राधान्य क्रमानुसार गावे (High and Moderate)

ई) अपूर्ण पाणलोट

उ) ग्राम सभेच्या मान्यतेने/लोकसहभाग/स्थानिक जिल्हा समितीने शिफारस केलेली तथापि पाण्याच्या ताळेबंदावर आधारीत पात्र कामे

**२.२ गाव आराखडा :**

अ) पाणलोट क्षेत्र हा नियोजनाचा घटक राहील. उपचार क्षमता नकाशा MIS पोर्टल वरून उपलब्ध करुन घेऊन ग्रामसमितीच्या मान्यतेने गाव आराखडा तयार करण्यात येईल. सरपंच हे ग्रामसमितीचे पदसिद्ध अध्यक्ष राहतील. ग्राम समितीमध्ये ग्रामपंचायत सदस्य, प्रगतशिल शेतकरी, पुरस्कार प्राप्त शेतकरी,

महिला प्रतिनिधी, जलसेवक व गावाशी संबंधित शासकिय क्षेत्रीय कर्मचारी यांचा समावेश राहील. जलसंधारण अधिकारी व कृषी पर्यवेक्षक हे समन्वयक म्हणून काम पाहतील. त्यानुसार विविध यंत्रणांकडून आवश्यक ती सर्व माहिती उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी नोडल अधिकारी म्हणून जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग यांची राहील.

आ) सदर माहितीच्या आधारे ग्रामसमिती सोबत शिवार फेरी घेण्यात येवून त्यानुसार प्राथमिक गाव आराखडा तयार करावा.

इ) प्राथमिक आराखड्यातील कामाचे संबधित यंत्रणेच्या सक्षम अधिकाऱ्याने तातडीने सर्वेक्षण करून तांत्रिक व आर्थिक मापदंडानुसार योग्य कामे अंतिम करावी.

ई) प्राथमिक आराखड्यातील जी कामे तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे व आर्थिक मापदंडानुसार अनुज्ञेय आहे अशाच कामांचा अंतिम आराखड्यामध्ये समावेश करावा. अंतिम आराखड्याला ग्रामसभेची मान्यता घ्यावी.

उ) गाव आराखडा तयार करतेवेळी गाव घटक ऐवजी पाणलोट घटक विचारात घेऊन कामांचे योग्य ते नियोजन करण्यात यावे.

ऊ) गावाच्या पाण्याचे अंदाजपत्रकामध्ये गावातील पिण्याच्या पाण्याची गरज, शेतीसाठी लागणारे पाणी व जनावरासाठी लागणारे पाणी विचारात घेतले जावे. पाणलोटामध्ये उपलब्ध पाणी, वाहून जाणाऱ्या पाण्यामधून किती पाणी अडविले आहे, किती पाणी अडवू शकतो या बाबी ताळेबंद करताना विचारात घेण्यात याव्यात.

**२.३ घेण्यात येणारी कामे :**

पाणलोट हा नियोजनाचा केंद्रबिंदू राहील. पाणलोट हा घटक समजून माथा ते पायथा या तत्वावर क्षेत्र उपचाराची व ओघळ उपचाराची सर्व अनुज्ञेय कामे हाती घेण्यात यावीत.

**२.४ कामाचा प्राधान्यक्रम :**

अ) अपुर्ण/प्रगतीपथावरील कामे.

आ) क्षमता पुन:स्थापित करण्याबाबतची दुरुस्ती/नूतनीकरणाची कामे.

इ) क्षेत्र उपचार कामे.

ई) नालाउपचाराची कामे.

उ) लोकसहभाग/सार्वजनिक खाजगी भागीदारीतील कामे.

**२.५ तांत्रिक व प्रशासकीय मान्यता: -**

अ) अंतिम आराखड्याला ग्रामसभेची मान्यता झाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणांनी प्राधान्याने त्यांच्या नियमित आर्थिक तरतुदीतून अभिसरणातून ही

कामे घेण्यात यावी. विभागामार्फ़त राबविण्यात येणाऱ्या कामांना प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार तांत्रिक व प्रशासकीय मान्यता द्यावी.

आ) जी कामे अभिसरणाद्वारे इतर योजनेतून घेणे शक्य होणार नाही अशा कामांना जलयुक्त शिवार अभियान लेखाशिर्ष ४४०२ २७८१ अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या तरतूदीमधून जिल्हाधिकारी प्रशासकीय मान्यता देतील.

इ) अभिसरणातून मान्यता देण्यात येणाऱ्या कामांना प्रचलित तरतूदीनुसार सक्षम स्तरावर प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

ई) प्रशासकीय मान्यता आदेशामध्ये निधी उपलब्धतेचे लेखाशिर्ष नमूद करणे बंधनकारक राहील.

उ) नियमित योजनांमधून संबंधित आर्थिक वर्षात निधी उपलब्ध नसल्याचे सक्षम स्तरावरून प्रमाणित केल्यानंतर जलयुक्त शिवार अभियान लेखाशिर्ष ४४०२ २७८१ मधून प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

**२.६ जलपरिपूर्णता अहवाल तयार करणे** -

गाव आराखड्यानुसार कामे झाल्यानंतर गावाचा जलपरिपूर्णता अहवाल तयार करण्यात यावा.

**३. जलयुक्त शिवार अभियान प्रथम टप्पा व इतर पाणलोट क्षेत्र कार्यक्रमांतर्गत कामे झालेल्या गावांमध्ये नवीन कामे घेणे** -

३.१ जलयुक्त शिवार अभियान प्रथम टप्पा, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम), नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, आदर्श गाव योजना व इतर पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविलेल्या गावांमध्ये उपचार क्षमता नकाशे व जलपरिपूर्णता अहवाल या आधारे अपधाव शिल्लक असल्यास व गावाची पाण्याची गरज असल्यास नवीन कामे व देखभाल दुरुस्तीची तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या योग्य असलेली कामे घेण्यात यावी. नवीन घेण्यात आलेल्या कामाचा यापूर्वी अंतिम केलेल्या गाव आराखड्यात व जलपरिपूर्ण अहवालात समावेश करावा.

**३.२ देखभाल दुरुस्ती कार्यक्रम :-**

पूर्ण झालेल्या योजनांचा कार्यक्षम वापर होण्याकरिता व सिंचन क्षेत्र पुन:स्थापित करण्याकरिता मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारित असणाऱ्या योजनांची देखभाल दुरुस्ती (परिरक्षण) करण्यात यावी.

**३.३ पाणलोट विकास निधी व देखभाल दुरुस्ती**

अ) पंतप्रधान कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास (एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम) अंतर्गत पाणलोट समिती स्तरावर **पाणलोट विकास निधी** (WDF) या नावाने खाते आहे. यामधील पुर्ण झालेल्या प्रकल्पांचे प्रकल्प हस्तांतरण प्रक्रियेमध्ये **पाणलोट विकास निधी** (WDF) हे खाते संबंधीत ग्रामपंचायतीकडे हस्तांतरण करण्यात आले आहे. हस्तांतरानंतर सदरील

खाते सरपंच व ग्रामसेवक यांचे नावे आहे. सदरील खात्यामधील रक्कमेचा उपयोग पाणलोट उपचारांच्या झालेल्या कामांच्या देखभाल दुरूस्तीसाठी करण्यात यावा. **पाणलोट विकास निधी** (WDF) या नावाने संयुक्त खाते नसलेल्या गावामध्ये याच धर्तीवर संबंधित ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामसेवक यांच्या नावे स्वतंत्र खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यात येऊन त्यामध्ये शासन स्तरावरून प्रोत्साहनपर प्राप्त निधी केवळ मृद व जलसंधारणाच्या देखभाल व दुरूस्तीच्या कामांसाठीच खर्च करण्यात यावा.

आ) गावामध्ये निर्माण झालेल्या मृद व जलसंधारणाच्या उपचाराच्या देखभाल दुरुस्तीसाठी येणाऱ्या अंदाजीत खर्चाच्या १० टक्के निधी ग्रामपंचायत निधीतून/लोक सहभागातून राखून ठेवला तर शासनाकडून ९० टक्के प्रती वर्ष रुपये ५ लक्ष व (जास्तीत जास्त १० लक्ष) प्रोत्साहनपर निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. देखभाल दुरुस्तीसाठी राखून ठेवलेल्या निधीचा वापर संपूर्ण पाणलोटात झालेल्या कामांच्या नोंदी घेणे, ओढ्या नाल्यावरील अतिक्रमणे काढणे व नाला रुंदीकरण करणे, अतिक्रमण काढण्यासाठी भूमि अभिलेख मार्फत मोजणी करणे, ओढ्या/नाल्यांच्या सीमा निश्चित करणे, या बाबींसाठी प्राधान्याने करावा. लोक सहभागामध्ये श्रमदानाचे मूल्यही ग्राह्य धरावे. देखभाल व दुरुस्तीचे कामे मनरेगा मधून घेण्यास प्राधान्य द्यावे. मनरेगाच्या कुशल खर्चाचे प्रमाण ४०% पेक्षा अधिक होत असल्यास पाणलोट विकास निधीची त्याला जोड देता येईल.

इ) देखभाल दुरुस्ती करिता शासनाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

३.४ देखभाल दुरुस्तीचे कामे उपलब्ध करून दिलेल्या निधीतून तसेच जिल्हास्तर व राज्य स्तरीय दुरुस्ती लेखाशिर्ष मधून करण्यात येईल.

**४. जलसाक्षरता :**

४.१ मृद व जलसंधारण विभागामार्फ़त जलयुक्त शिवार अभियान प्रथम टप्पा प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम), नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प व आदर्श गाव योजनाअंतर्गत (स्मार्ट योजना) पुर्ण झालेल्या गावातील ग्रामस्थांची तसेच नव्याने कार्यक्रम हाती घेण्यात येणाऱ्या गावामधील ग्रामस्थांची जलसाक्षरता अभियानाव्दारे जनजागृती करणे आवश्यक आहे.

**४.२ जलसाक्षरता प्रशिक्षण**

जलसाक्षरता केंद्र, यशदा, पुणे यांच्यामार्फत गावामधील सरपंच/ महिला प्रतिनिधी /ग्राम कार्यकर्ता/शेतीमित्र/जलसेवक /प्रगतशिल शेतकरी /पुरस्कार प्राप्त शेतकरी/ ग्राम रोजगार सेवक गावाशी संबंधित शासकिय क्षेत्रीय कर्मचारी यांचे जलसाक्षरतेबाबत ३ दिवसांचे प्रशिक्षण आयोजित करावे. प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षक तयार करण्यासाठी

कार्यक्रम तयार करण्यात यावा. प्रशिक्षणामध्ये जलसाक्षरतेबरोबरच जमिनीच्या आरोग्याबाबतही जनजागृती होण्यासाठी या विषयाचा प्रशिक्षणामध्ये समावेश करावा. प्रशिक्षणाकरीता समाज माध्यमांचा पुरेपूर वापर करावा.

प्रशिक्षणामध्ये जल व मृदसंधारणाचे महत्व, पाण्याचा ताळेबंद, पाणलोट क्षेत्र उपचाराची माहिती, पाण्याचे अंदाजपत्रक, लोकसहभागाचे महत्व, सामूहिक जबाबदारी, गावांचा जलआराखडा तयार करणे, जीआयएस प्रणाली आणि तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शकता, जलव्यवस्थापन, तयार मत्तांची देखभाल दुरुस्ती व हस्तांतरण याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे. त्यासोबतच जलयुक्त शिवार अभियान टप्पा-१ मध्ये झालेल्या कामांमुळे निर्माण झालेले पाणीसाठे, सिंचनक्षमता, लोकसहभागातून पूर्ण झालेली कामे व त्याचा झालेला दृश्य परिणाम याबाबतची माहिती देऊन त्यास प्रसिद्धी द्यावी.

### ४.३ पाण्याचा ताळेबंद-

जलसाक्षरतेमध्ये पाणलोट क्षेत्रातील पाण्याचा ताळेबंद महत्वाचा आहे. पाणलोट क्षेत्रामध्ये येणारे पाणी, त्याचा होणारा उपयोग व त्यानुसार शिल्लक /कमी असलेले पाणी, याची माहिती सर्व उपभोक्तांना असणे आवश्यक आहे. पाण्याच्या ताळेबंदाद्वारे एकूण उपलब्ध होणारे पाणी व वापरात येणारे पाणी याचा लेखाजोखा ग्रामसभेसमोर मांडण्यात यावा. हिवरेबाजार, जिल्हा- अहमदनगर व आयआयटी मुंबई यांनी पाण्याच्या ताळेबंदाचे प्रारूप तयार केलेले आहे. त्या प्रारूपाचा वापर करून जलसाक्षरतेची व्यापक स्वरूपाची मोहीम हाती घेण्यात यावी व पाणी ताळेबंदाबाबत ग्राम पातळीवर जनजागृती वाढविण्यात यावी.

## ५ पाण्याचा कार्यक्षम वापर :

### ५.१. मूलस्थानी जलसंधारण:-

पिक उत्पादकतेमध्ये शाश्वतता आणण्यासाठी मृद व जलसंधारणाच्या विविध उपचारांच्या अंमलबजावणी सोबत मूलस्थानी जलसंधारणाच्या समतल मशागत व उताराला आडवी पेरणी, आंतर पीक पध्दती/मिश्र पीक पध्दती, मृतसरी उघडणे / काढणे (Dead Furrow), रुंद वरंबा सरी पध्दतीने पेरणी (BBF Sowing), शून्य मशागत तंत्रज्ञान, हिरवळीचे खत, नॅडेप कंपोस्टींग, गांडुळखत इ. माध्यमातून जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढविणे इत्यादी बाबींचा आराखड्यामध्ये समावेश करावा.

मूलस्थानी जलसंधारण करताना शून्य मशागत, समतल रेखा आखून उताराला आडवी पेरणी करणे त्याचबरोबर कार्बन क्रेडीट प्राप्त करुन घेण्यासाठीही कामकाज करावे व कार्बन क्रेडीटचे मिळणारे मूल्य पाणलोट विकास निधीमध्ये जमा करावे. मूलस्थानी जलसंधारणाकरीता वृक्ष लागवड व विविध पिक पध्दतीचा अवलंब करण्यासाठी संबंधीत विभागांनी स्वतंत्र आराखडा करून तो राबवावा. संपूर्ण पाणलोटामध्ये ज्या ज्या ठिकाणी शक्य आहे, अशा ठिकाणी तसेच नालाकाठ

स्थिरीकरणाच्या उद्देशाने नाला काठावर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीची कामे करण्यात यावीत.

**५.२. सुक्ष्म सिंचन पध्दतीचा वापर:-**

सुक्ष्म सिंचन (ठिबक/तुषार) या पध्दतीचा वापर करणेसाठी जन जागृती करणे. याकरिता कृषि विभागामार्फ़त अनुदानावर संच उपलब्ध होत आहेत व त्यामुळे पाणी वापरामध्ये बचत होते. पिकास आवश्यक तेवढेच पाणी मिळाल्याने उत्पादनात वाढ होते. तसेच बचत झालेल्या पाण्यामधून जास्तीचे क्षेत्र सिंचनाखाली आणता येते.

**५.३ समन्यायी पाणीवाटप व्यवस्थापन कार्यक्रम**

इंदोरे, ता. दिंडोरी, जि. नाशिक तसेच इतर ठिकाणी पाणी वापर संस्थांच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे पाण्याचे समन्यायी पाणी वाटप व्यवस्थापन करण्यात आलेले आहे. अशा नाविण्यपूर्ण पध्दतीने पाणी वाटप व्यवस्थापन कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**५.४ सामुहिक सिंचन सुविधा**

खरीप पिकांना पावसाच्या खंडाच्या कालावधीत एक संरक्षित सिंचन देणे तसेच रब्बी पिकांना पेरणीनंतर संरक्षित पाणी दिल्यास उत्पादकतेत निश्चित वाढ होते. जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत मोठ्या प्रमाणात विकेंद्रित पाणी साठे तयार झाले आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर जल पुनर्भरण होऊन भूजल पातळीत वाढ झाली आहे. गावामध्ये शेतकऱ्यांना सिंचन सुविधा निर्माण करण्यासाठी व जलसंधारण कामातून उपलब्ध झालेल्या पाण्याचा कार्यक्षम वापर होण्यासाठी शेतकऱ्यांना सामुहिक सिंचन सुविधासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. राज्यात शेतकरी गट व शेतकरी उत्पादन कंपन्या मोठ्या प्रमाणावर स्थापन झालेल्या आहे. त्यांच्यामार्फत सामुहिक सिंचनाचे काही ठिकाणी चांगले प्रकल्प उभे राहिले आहे. सामुहिक सिंचन सुविधेचा लाभ घेण्याकरीता फक्त शेतकरी गट किंवा शेतकरी उत्पादन कंपन्या पात्र राहतील. याकरिता किमान शेतकरी संख्या २० व सिंचनाखाली येणारे क्षेत्र २० हेक्टर असावे. कोकण विभागासाठी यामध्ये १० एकरपर्यंत क्षेत्रास मान्यता देता येईल. सामुहिक सिंचन सुविधांमध्ये पाण्याचा स्रोत, पाणी उपशासाठी पुरेशा अश्वशक्तीचे पंप, सोलर किंवा विद्युत जोडणी, पाण्याच्या साठवणूकीसाठी शेततलाव अथवा संतुलन टाकी, पाण्याच्या स्रोतापासून ते पाणी साठवण व्यवस्थेपर्यंत पाईपलाईन या बाबींचा समावेश राहील. सामुहिक सिंचन योजनेसाठी प्रती हेक्टरी रु. १ लाख किंवा जास्तीत जास्त रु. २५ लक्ष इतके आर्थिक सहाय्य देण्यात येईल. प्रथम टप्प्यात २००० गटांचा समावेश करण्यात येईल.

सामुहिक सिंचन सुविधेचा लाभ घेणारे शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचा वापर बंधनकारक करण्यात यावा व या शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासाठी PMKSY मधून प्राधान्याने अनुदान देण्यात यावे. प्रस्तावित सामुहिक सिंचन योजनेमधून खरीपामध्ये किमान १ व रब्बी मध्ये किमान २ पाणी देता येईल ऐवढ्या पाण्याची उपलब्धता आहे याची शाश्वती असावी.

यासाठी शेतकऱ्यांना आत्मा अंतर्गत गट नोंदणी करणे बंधनकारक राहील. क्षेत्राचे प्रमाणात झालेला खर्च व देखभाल दुरूस्तीचा खर्च करण्यासाठी गटातील समाविष्ट शेतकऱ्यांची सहमती आवश्यक राहील. पाणी साठवण्यासाठी घेण्यात येणारा सामुहिक तलाव अथवा टाकीसाठी जागा गटाच्या मालकीची अथवा किमान २५ वर्षाच्या भाडेकराराने उपलब्ध असावी. भाडेकरार नोंदणीकृत अथवा नोटरी केलेला असावा. पाणी वाटपाचा सामंजस्य करार करण्यात यावा. सिंचनासाठी आवश्यक परवानग्या घेणे आवश्यक राहील.

सामुहिक सिंचन सुविधा निर्माण झाल्यानंतर समुह/गट सदस्यांनी शेतकरी उत्पादक कंपन्या/संस्था (FPC /FPO) स्थापन करून शेतमाल प्राथमिक प्रक्रिया, विपणन करणेबाबत (मुल्यसाखळी विकसीत करणेबाबत) प्रयत्न करावेत.

**५.५ प्लास्टीक अस्तरीकरण शेततळ्यामध्ये पाणी भरणे**

शेततळे हा शाश्वत सिंचनाकरीता उपयुक्त असा स्त्रोत आहे. राज्यात मागेल त्याला शेततळे व इतर योजनेच्या माध्यमातून अडीच लाखापेक्षा अधिक शेततळ्यांची निर्मिती झालेली आहे. या शेततळ्यांमध्ये काही ठिकाणी प्लास्टीक अस्तरीकरण करून पाणीसाठा केला जातो. पावसाळ्यात ज्या ठिकाणी अतिरिक्त पाणी आहे अशा ठिकाणी प्लास्टिक अस्तरीकरणाद्वारे तयार प्लास्टिक अस्तरीकरणाच्या शेततळ्यामध्ये पाणी पावसाळ्यात साठवले जाते. परंतु काही ठिकाणी पावसाळ्यात पाण्याची उपलब्धता नसतानासुद्धा भूगर्भातील पाण्याच्या स्त्रोताद्वारे पाणी साठवले जाते. ज्यावेळेस अतिरिक्त पाणी असेल अशा वेळेस शेततळ्यामध्ये पाणी भरण्यास हरकत नाही, परंतु ज्या वेळेस भूगर्भातील पाण्याची पातळी कमी आहे अशा परिस्थितीमध्ये शेततळ्यामध्ये पाणी भरण्याकरता सामुहिक निर्णय प्रक्रियेची आवश्यकता आहे.

ओढे, नाले वाहत नसताना व स्त्रोतातील पाण्याची पातळी कमी असताना शेततळे भरु नये. उथळ स्तर संतृप्त झाल्यानंतर आणि बेसल फ्लो सुरु झाल्यानतंर शेततळे भरणेबाबत निर्णय घ्यावा. ज्या भागात कमी पाऊस पडतो व पुन्हा निश्चीत पावसाची खात्री नसते अशा ठिकाणी शेततळे भरण्याबाबत स्थानिक परिस्थितीनुसार ग्रामसभेमध्ये निर्णय घेण्यात यावा.

**५.६ पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या गावांमध्ये साठवण तलाव निर्माण करणे**

पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या गावांमध्ये ग्रामपंचायत स्तरावर पिण्याच्या पाण्याच्या विहीरीजवळ अथवा गावात जेथे शासकीय जमीन आहे तेथे एक साठवण तळे (प्लॅस्टिक अस्तिकरणासह) करण्यात यावे. सदरचा साठवण तळे अतिरिक्त वाहून जाणाऱ्या पाण्याने भरावे. भूगर्भातील पाणी उपसा करून भरु नये.

**६ . लोकसहभाग**

६.१ राज्यात शासकीय निधीमधून तसेच अशासकीय संस्था, खाजगी संस्था, धर्मादाय संस्था, व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्व (CSR) निधी व लोक सहभाग यामधून देखील मृद व जलसंधारणाची कामे हाती घेण्यात येत आहेत. त्यानुषंगाने

खाजगी/अशासकीय संस्था यांना संस्थाचा लोकसहभागासह किमान ४५% सहभाग व उर्वरीत कमाल ५५ % राज्य शासन सहभाग यानुसार प्रकल्प म्हणून कामे हाती घेता येतील.

१) शासनाच्या सहभागाने (Public Private Partnership PPP तत्वावर) करावयाचे जिल्ह्यातील प्रस्ताव प्रथम संबंधित संस्थेने तयार करून जलयुक्त शिवार अभियानांच्या जिल्हास्तरीय समिती यांची मान्यता घेण्यात यावी.

२) या प्रकल्पांतर्गत सर्व उपचारांचे तांत्रिक व आर्थिक मापदंड शासनाने विहीत केलेल्या निकषांनुसार असावेत. तसेच जिल्हाधिकारी यांनी मान्यता देण्यापुर्वी संबंधित समुचित प्राधिकरणाकडून/तांत्रिक विभागाकडून प्रस्ताव तपासून घेण्याची कार्यवाही करावी.

३) सहभागी होणारी खाजगी संस्था/अशासकीय संस्था यांच्या सोबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत आवश्यक तो करारनामा करण्यात यावा. कामे पूर्ण झाल्यानंतर कामांची मालकी ही शासनाची राहील ही बाब स्पष्टपणे करारात नमूद करण्यात यावी.

४) शासनाकडे सहभागी संस्थाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानतंर त्यास १५ दिवसात मान्यता देण्यात यावी.

५) शासनाच्या हिश्याची रक्कम ही जलयुक्त शिवार अभियानाकरीता जिल्हाधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेल्या निधीमधून/मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अथवा इतर अनुज्ञेय योजनाच्या निधी स्रोतातून उपलब्ध करुन देण्यात यावी. याबाबत निधी उपलब्धतेची प्रथम खात्री करावी.

६) कामाचे मोजमापे घेण्याची कार्यवाही करण्यासाठी संस्था, शासन व स्थानिक जनता या तिन्ही घटकांच्या प्रतिनिधींचे संयुक्त पथक गठित करण्यात यावे.

७) सदर कामे करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/परिपत्रक /आदेश यामधील सूचना लागू राहतील .

८) PPP तत्वावर मृद व जलसंधारणाची खालीलप्रमाणे कामे करण्यास अनुज्ञेय असतील

अ) पाणलोट क्षेत्र विकासाची कामे

आ) क्षेत्र उपचार: कंपार्टमेंट बंडिग, ढाळीचे बांध, सलग समतल चर, खोल सलग समतल चर, मजगी, अनघड दगडी बांध, शेततळे, जुनी भात शेती बांध दुरूस्ती, शेतबांध दुरूस्ती, जुन्या बोडीचे नुतनीकरण/खोलीकरण इ.

इ) नाला उपचार : सिमेंट नाला बांध , माती नाला बांध, अर्दन स्ट्रक्चर, गॅबियन बंधारा, वळण बंधारा, रिचार्ज शाफ्ट,

६.२ लोकसहभागातून ओढे/नाले/नदी अतिक्रमण मुक्त करून खोलीकरण व रुंदीकरण करणे तसेच ओढा/ नाला / लहान नदी जोड प्रकल्प राबविण्याकरिता गावातील छोटे ओढे/नाले/नदी यांचा अभ्यास करून नाला जोड प्रकल्पात समावेश करावा. याकरिता लागणारा इंधनाचा खर्च अभिसरणातून अनुज्ञेय असलेल्या योजनेतून देय असेल .

६.३ भूस्तराचे फिल्टर (मुरूम व पक्का मुरूम ) काढला जाणार नाही, याची दक्षता घेऊन ओढे/नाले/नदी अतिक्रमण मुक्त करून खोलीकरण व रुंदीकरण करावे. नाला रुंदीकरण कामे करताना नाल्याचे सरळीकरण करण्यात येवू नये.

६.४ गाळ मूक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६.५ मत्ता नसलेल्या नागरिकांना स्वयंरोजगारची संधी उपलब्ध करून देणे. बचत गटांना तसेच शेतकऱ्यांसाठी उत्पादन पध्दतीवर आधारित कृषि प्रक्रिया उद्योगांना सहाय्य करणे. कृषी उत्पन्न वाढवून लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी मदत करणे इत्यादी विविध बाबीकरिता एकत्रित आराखडा तयार करून अनुज्ञेय असलेल्या योजनांच्या माध्यमातून अभिसरणाद्वारे सदर कार्यक्रम राबवावा.

**७. संनियंत्रण /मुल्यमापन :- जलयुक्त शिवार अभियाना २.० चे संनियंत्रण/ मुल्यमापन करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे विभागीय समित्या गठित करण्यात येतील.**

**७.१** आढावा, सनियंत्रण व कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणी साठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तसेच तालुकास्तरावर उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समित्या गठीत करण्यात येतील.

**जिल्हास्तरीय समिती : -**

| अ.क्र. | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी | सह अध्यक्ष |
| ३. | उपवनसंरक्षक, वनविभाग | सदस्य |
| ४. | उप जिल्हाधिकारी (रोहयो) | सदस्य |
| ५. | कार्यकारी अभियंता (ग्रामिण पाणी पुरवठा) जिल्हा परिषद | सदस्य |
| ६. | वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य |

| अ.क्र. | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| ७. | विभागीय वन अधीकारी, समाजिक वनीकरण विभाग | सदस्य |
| ८. | कार्यकारी अभियंता, जलसंपदा सर्व सबंधीत विभाग | सदस्य |
| ९. | कार्यकारी अभियंता, लघु सिंचन जिल्हा परिषद | सदस्य |
| १०. | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | सदस्य |
| ११. | संबधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती/संस्था (निमंत्रित) | सदस्य |
| १२. | जिल्हा जलसंधारण अधिकारी | सदस्य सचिव |

**तालुकास्तरीय समिती :-**

| अ.क्र | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १. | उपविभागीय अधिकारी (प्रांत) | अध्यक्ष |
| २. | गट विकास अधिकारी | सहअध्यक्ष |
| ३. | उपविभागीय कृषि अधिकारी | सदस्य |
| ४. | तहसिलदार | सदस्य |
| ५. | उपविभागीय अभियंता (पाणी पुरवठा) | सदस्य |
| ६. | उपविभागीय अभियंता (जलसंपदा) | सदस्य |
| ७. | तालुका कृषि अधिकारी | सदस्य |
| ८. | उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.जं.पा | सदस्य |
| ९. | वन परिक्षेत्र अधिकारी, वन विभाग | |
| १०. | वन परिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनीकरण | सदस्य |
| ११. | तज्ञ व्यक्ती (जलसंधारण) | सदस्य |
| १२. | अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| १३. | उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग | सदस्य सचिव |

**७.२ गुणवत्ता, पारदर्शकता,**

१) **निविदा :** अभियानांतर्गत कामे गुणवत्ता पुर्वक होण्याच्या अनुषंगाने किमान ३.०० लक्ष किंमतीपेक्षा अधिक कामाची ई-निविदा प्रकाशित करावी. तसेच पाऊस, नाल्यामधील पाणी, शेतातील उभी पिके इ. बाबी विचारात घेता मृद व जलसंधारणाची कामे करण्यास कमी कालावधी मिळत असल्याने अल्प कालावधी निविदा सुचना प्रकाशित करण्यात याव्यात. १० % पेक्षा

कमी दराने निविदा प्राप्त झाल्यास संबधित कंत्राटदाराकडून Rate analysis प्राप्त करून घ्यावे. Rate analysis असमाधानकारक असल्यास निविदा अस्वीकृत करावी.

२) मृद व जलसंधारण विभागाने निश्चित केलेले आर्थिक मापदंड सर्व विभागांना लागू राहतील. इतर विभागाचे आर्थिक मापदंड लागू राहणार नाहीत.

३) **दोष निवारण कालावधी :** कामाचा दोष निवारण कालावधी ५ वर्ष राहील, ही अट निविदा प्रसिध्द करताना अटी /शर्तीमध्ये नमूद करावी.

४) **कामाची माहीती फलक/बोर्ड लावणे**: काम झाल्यानंतर विभागाचे नाव, कामाचे नाव, कामाची किंमत, कार्यारंभ आदेशाचा दिनांक, काम सुरु केल्याचा दिनांक, काम पूर्ण झाल्याचा दिनांक, कंत्राटदाराचे नाव इ. माहिती फलक/बोर्ड वर रेडीअम रंगाने लिहावी.

५) **कामास भेट:** वरिष्ठ पर्यवेक्षक अधिकारी तसेच दक्षता व गुणनियंत्रण पथकाने कामास प्राधान्याने भेट द्यावी.

६) **ऑनलाईन संनियत्रण :** - जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात येणारी कामे गुणवत्तापूर्ण व पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी एकात्मिक ऑनलाईन प्रणाली खालीलप्रमाणे कार्यान्वित करण्यात यावी.

a. जलयुक्त शिवार, IWMP, POCRA आणि आदर्श गाव या योजनांतर्गत पूर्वी कामे झालेल्या गावांचे जलपरिपूर्णता अहवाल अद्ययावत करण्यात यावेत.

b. जिल्हा समिती मार्फत मान्यता प्राप्त वर्कऑर्डर बद्दलची सविस्तर माहिती MIS पोर्टलवर नोंदविण्यात यावी.

c. MIS पोर्टलवर नोंदविलेल्या कामांचे unique ID generate करावेत व प्राप्त unique ID द्वारे काम सुरू होण्यापुर्वी, काम सुरू झाल्याचे व काम पूर्ण झालेल्या कामाचे जिओ टॅगिंग करुन फोटो काढण्यात यावेत.

d. टप्पा निहाय देयके अदा करावयाची असल्यास त्या त्या टप्प्याचे जिओ टॅगिंग करुन फोटो मोबाइल अँपद्वारे अपलोड करण्यात यावेत.

e. प्राप्त unique ID द्वारे काम पूर्ण झाल्याचे जिओ टॅगिंग करण्यात यावे आणि फोटो मोबाइल अँप द्वारे अपलोड करण्यात यावेत.

f. देयकाच्या अदायगीसाठी MIS पोर्टल द्वारे स्वयंचलित Challan तयार करणे.

g. जल परिपूर्णता अहवाल MIS पोर्टल द्वारे स्वयंचलित पद्धतीने निर्माण करणे.

७) ऑनलाईन प्रणालीद्वारे अभियानाचे संनियंत्रण करण्यासाठी PMU कक्ष निर्माण करण्यात यावा. GIS, MIS व अँड्रॉइड अँपमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये सुसूत्रता यावी व अडचणींचे तात्काळ निवारण व्हावे यासाठी GIS, MIS व अँड्रॉइड अँप उपलब्ध करून देणाऱ्या सेवा पुरवठादाराचे प्रतिनिधींचा PMU कक्षात समावेश करण्यात यावा..

८) क्षेत्रीय स्तरावरील माहिती अद्ययावत करण्याकरिता तालुका, जिल्हा, विभागीय स्तरावर डेटा एन्ट्री ऑपरेटरची नोडल कार्यालयात नेमणूक करण्यात यावी.

९) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत होणारी कामे गुणवत्तापुर्ण व पारदर्शी होण्यासाठी Online Monitoring करण्यात यावे. कामांचे फोटोग्राफ जिओ (अंशास, रेखांशसह) टॅगिंगसह (काम सुरु होण्यापुर्वी, काम सुरू करताना, काम सुरु असताना व पुर्ण झाल्यावर) MRSAC प्रणालीवर अपलोड करावेत तसेच साप्ताहिक प्रगती अहवाल ऑनलाईन पध्दतीने सादर करावा.

**७.३ पोर्टल / IT system :**

राज्यामध्ये आजपर्यंत विविध विभाग, योजना यांच्या माध्यमातून मृद व जलसंधारणाची अनेक कामे करण्यात आलेली आहेत. तथापि या कामाची संपुर्ण माहिती अथवा स्थळ कोणत्याही एका नकाशावर अथवा संकेतस्थळावर नाही.

सर्व मृद व जलसंधारण कामाचे मॅपिंग करून उपचार क्षमता नकाशे अद्यावत ठेवण्याकरिता एक जिओ पोर्टल विकसीत करण्यात येईल.

सदर पोर्टल विकसित करण्यासाठी आयुक्त, मृद व जलसंधारण हे नोडल अधिकारी असतील.

सदर पोर्टलवर झालेल्या प्रत्येक कामाची नोंद घेण्यात येईल. पोर्टलवर नोंद झाली असल्याची खात्री करण्याची जबाबदारी संबधित अमंलबजावणी करणाऱ्या जिल्हास्तरीय यंत्रणेची राहील.

८. **मुल्यमापन :-** काम सुरु असताना समवर्ती मुल्यमापन करावे तसेच काम पुर्ण झाल्यानंतर त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करावे. समवर्ती मुल्यमापन व त्रयस्थ संस्थेमार्फत करावयाच्या मुल्यमापनाकरिता टाटा ट्रस्ट सारख्या वेगवेगळ्या नामांकित सामाजिक संस्थाची निवड, शासन निर्णय नियोजन विभाग दिनांक २२ जुलै, २०१६ व दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ नुसार करावी.

९. **ग्रामसभेस अवगत करणे :-** गावामध्ये अभियानांतर्गत करण्यात आलेल्या कामाबाबत ग्रामसभेस अवगत करावे.

**१०. निधी उपलब्धता व वितरण:**

**१०.१ निधी स्त्रोत :** जलयुक्त शिवार २.० योजना विविध योजनाच्या अभिसरणातून ५००० गावांमध्ये राबविण्यात यावी. मृद व जलसंधारण विभाग (केंद्र व राज्य पुरस्कृत योजना), कृषि विभाग (केंद्र व राज्यपुरस्कृत योजना), मग्रारोययो, जिल्हा नियोजन व विकास समिती निधी, जिल्हा परिषद, CSR निधी, सार्वजनिक खाजगी भागिदारी, लोकसहभाग इत्यादी स्त्रोतापासून निधीची उपलब्धता करण्यात यावी. अभिसरणाच्या माध्यमातून निधी उपलब्ध होत नसल्यास, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत लेखाशिर्ष ४४०२ २७८१ मध्ये निधीची तरतुद करण्यात यावी व सदर निधीतून, अभिसरणाच्या माध्यमातून निधी उपलब्ध होत नसलेल्या कामांना निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

**१०.२ निधी वितरण:**

१) लेखाशिर्ष ४४०२ २७८१ मधील निधी आयुक्त, मृद व जलसंधारण यांचे मार्फत जिल्हा जलसंधारण अधिकारी यांना वितरीत करण्यात येईल. जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी जिल्हास्तरीय समितीच्या मान्येतेने सर्व विभागांना निधी वितरीत करावा .

२) तसेच अन्य नियमित योजनांचा निधी प्रचलित पध्दतीने उपलब्ध होईल.

३) व्यावसायिक सामाजिक उत्तर दायित्व निधी, मुख्यमंत्री सहायत्ता निधी जिल्हाधिकारी यांचेमार्फ़त अमंलबजावणी यंत्रणेस उपलब्ध होतील.

**११. संकिर्ण :-**

**११.१ लाभक्षेत्रात कामे घेणे:** मोठे/मध्यम/लघु प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात जेथे सिंचनासाठीचा पाणीपुरवठा अनियमित/अपुरा आहे अशा ठिकाणी आवश्यकतेनुसार मृद व जलसंधारण उपचार कामे घेण्यात यावीत.

**११.२ शासन निर्णय/परिपत्रक/सुचना/निर्देश :-** जलयुक्त शिवार २.० या योजनेस यापूर्वीच्या जलयुक्त शिवार अभियान टप्पा-१ च्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या सूचना लागू राहतील. (तपशील या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र-अ मध्ये जोडण्यात आला आहे.) तसेच या योजनेतील काही तरतुदी/सूचना पूर्वीच्या योजनेसाठी निर्गमित केलेल्या तरतुदी/सूचनापेक्षा भिन्न असल्यास या योजनेच्या तरतुदी लागू राहतील.

**१२.** हा शासन निर्णय नियोजन विभाग, वित्त विभाग, कृषि विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ग्राम विकास विभाग व जलसंपदा विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनुक्रमे १७२/ २०२२, दिनांक १.११.२०२२, ५९८/व्यय-१५, दिनांक २.११.२०२२, निरंक/१६.११.२०२२, १३/ पापु-१५, दिनांक १७.११.२०२२, ३३/यो-११, १८.११.२०२२ व ६४/सिंव्य (धोरण), दिनांक २५.११.२०२२ अन्वये केलेल्या सल्लामसलतीनंतर व तद्नंतर मंत्रीमंडळाने दिनांक १३ डिसेंबर, २०२२ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०१०३१९०४४०९२२६ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by EKNATH RAJARAM DAWALE
Date: 2023.01.05 13:17:46 +05'30'

**( एकनाथ डवले )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई (पत्राने)
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री, जलसंधारण यांचे खाजगी सचिव
४) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
७) प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय
८) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक
९) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहाय्यक
१०) प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक
११) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१२) प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१३) आयुक्त, मृद व जलसंधारण, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद
१४) अपर आयुक्त, मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद/पुणे/नागपूर
१५) आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, पुणे
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) सर्व प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग
१८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१९) संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
२०) संचालक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
२१) सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग/जि.प. ल.पा.
२२) जल -७ संग्रहार्थ.

**शासन निर्णय क्र. जशिअ-२०२२/प्र.क्र.३०२/जल-७, दिनांक ०३ जानेवारी, २०२३ सोबतचे प्रपत्र-अ**

| अ. क्र. | शासन निर्णय / परिपत्रक संदर्भ/पत्र | शासन निर्णय / परिपत्रकातील तपशील |
|---|---|---|
| १. | शासन निर्णय क्र.जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दिनांक ५ डिसेंबर, २०१४ | सर्वासाठी पाणी टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविणेबाबत. |
| २. | शासन पत्र जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दिनांक २ जानेवारी, २०१५ | जलयुक्त शिवार अभियान - गाव निवडीचे निकष |
| ३. | शासन पत्र क्र.जलशि-२०१५/प्र.क्र.१२/जल-७, दिनांक ९ जानेवारी, २०१५ | जलयुक्त शिवार अभियान-गावांची संख्या निश्चित करणेबाबत. |
| ४. | शासन शुध्दीपत्रक क्र.जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दिनांक २८ जानेवारी २०१५ | सर्वासाठी पाणी टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविणेबाबत. |
| ५. | शासन आदेश जलसंपदा विभाग क्र. सीडीए-१०१५/(२६/१५)/ लाक्षेवी (कामे), दि.३१.१.२०१५ | जलयुक्त शिवार अभियानात जलसंपदा विभागाने सक्रिय सहभाग घेण्याबाबत. |
| ६. | शासन परिपत्रक क्र.जशिअ-२०१५/प्र.क्र.०६/जल-७, दि.३/२/२०१५ | जलयुक्त शिवार अभियान<br>जलसंपदा व इतर विभागातील तांत्रिक/अतांत्रिक कर्मचारी यांच्या सेवा आवश्यकतेनुसार अन्य दुसऱ्या विभागात तात्पुरत्या स्वरुपात वळविण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्याबाबत. |
| ७. | शासन निर्णय क्रमांक जशिअ-२०१५/प्र.क्र.४०/जल-७, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५ | जलयुक्त शिवार अभियानाची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी शक्ती प्रदत्त समिती गठित करण्याबाबत. |
| ८. | शासन परिपत्रक क्र. जलशि-२०१५/प्र.क्र.६८/जल-७, दिनांक २१.२.२०१५ | साखळी सिमेंट नाला बांध बांधणे- अल्प कालावधी निविदा सूचना प्रसिध्द करणेबाबत. |
| ९. | शासन निर्णय क्र.जशिअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दि.३/३/२०१५ | जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत समाविष्ठ योजनासंबंधी अन्य कोणत्याही विभागाकडून निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय /परिपत्रक/ कार्यालयीन आदेश मधील तरतूदी आपोआप अधिक्रमीत होऊन सदर दि. ०५ डिसेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी या अंतीम समजण्यात याव्यात. |

| | | |
|---|---|---|
| १०. | शासन निर्णय क्र. डिएपी-२०१५/प्र.क्र.२३/का.१४८१, दिनांक ११.३.२०१५ | जिल्हा वार्षिक योजनेतून व आमदार स्थानिक योजनेतून जलयुक्त शिवार अभियानासाठी निधी उपलब्ध करणेबाबत. |
| ११. | शासन पत्र क्र.जशिअ-२०१५/प्र.क्र.२१०/जल-७, दि.३०/०४/२०१५ | अपवाद म्हणून एका कंत्राटदारास दोनपेक्षा जास्त क्लस्टरमधील कामे देण्यात येऊ नयेत, ही अट शिथिल करण्यास मान्यता देण्याबाबत |
| १२. | शासन निर्णय जलसंपदा विभाग क्र. सीडीए-१०१५/(२६/१५)/ लाक्षेवी (कामे) , दि.१२.३.२०१५ | जलसंपदा प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात जलयुक्त शिवार अभियान राबविणेबाबत. |
| १३. | शासन परिपत्रक क्र. जलशि-२०१५/प्र.क्र.११५/जल-७, दिनांक १३.३.२०१५ | जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी, कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कामांची गुणवत्ता राखणे व अंमलबजावणी पारदर्शक पध्दतीने करण्याबाबत. |
| १४. | शासन पत्र क्र.गपावि-२०१५/प्र.क्र.२१०/जल-७, दि.३०/०४/२०१५ | एका कंत्राटदारास दोनपेक्षा जास्त क्लस्टरमधील कामे देण्यात येऊ नये, ही अट शिथील करण्यास मान्यता देणेबाबत. |
| १५. | शासन पत्र क्र.गपावि-२०१५/प्र.क्र.१२९/जल-७, दि.३०/०४/२०१५ | जलयुक्त शिवार अभियानांतर्गत टंचाई, टँकरने पाणीपुरवठा, DPAP, Over Exployted हे निकष लावून गावे निवडण्यात आलेली असल्याने, जलयुक्त शिवार अभियानात निवडलेल्या गावातील सूक्ष्म पाणलोटांना गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करून देण्याकरीता सुकाणू समितीच्या पूर्व मान्यतेची अट शिथिल करण्याबाबत. |
| १६. | शासन पत्र क्र.जशिअ-२०१५/प्र.क्र.७१/जल-७, दि.११/०५/२०१५ | ज्या ज्या ठिकाणी निविदेला नगण्य अथवा अल्प प्रतिसाद मिळत आहे त्या त्या ठिकाणाकरिता संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या समितीने निविदेतील सदर अटी आवश्यकतेनुसार शिथिल करण्याबाबत योग्य ती कारणमिमांसा देऊन त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्यास हरकत नसावी. |
| १७. | शासन परिपत्रकम क्र.जशिअ-२०१५/प्र.क्र.२६४/जल-७, दिनांक १० जुन २०१५ | जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमांतर्गत पावसाळ्यामध्ये वृक्ष लागवड करण्याबाबत. |
| १८. | शासन परिपत्रकम क्र.जशिअ-२०१५/प्र.क्र.१८१/जल-७, दिनांक १० जुन २०१५ | जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमांतर्गत टंचाईमुक्त करण्यासाठी निवडण्यात आलेल्या गावांमध्ये Tanishka Womens Dignity Forum या संघटनेमधील महिलांचा सहभाग करण्याबाबत. |

| | | |
|---|---|---|
| १९. | शासन निर्णय क्र.नपुयो-२०१५/प्र.क्र.३७०/जल-७, दिनांक ८ डिसेंबर, २०१५ | जलयुक्त शिवार अभियांनातर्गत लोक सहभागाद्वारे राबविण्यात येत असलेलया नदी पुनर्जीवन कार्यक्रम विविध योजनांचे अभिसरण करुन प्रभावीपणे राबविण्याबाबत. |
| २०. | नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.डिएपी-२०१५/शिकाना/प्र.क्र.१८/का.१४८१, दिनांक २२.१२.२०१५ | सर्वांसाठी पाणी-टंचाई मुक्त महाराष्ट्र-२०१९ जलयुक्त शिवार अभियानासाठी जिल्हा वार्षीक योजनेमध्ये जलसंधारणांच्या योजनांच्या संबंधित ५० टक्के तरतुद दुरुस्ती व पुनर्जिवनाच्या कामांवर खर्च करण्यास मंजूरीबाबत. |
| २१. | शासन पत्र क्र.सिनाब-२०१६/प्र.क्र.८४/जल-७, दि.२९/२/२०१६ | दि. ११ मे, २०१५ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार टेंडर डॉक्यूमेंटमधील तांत्रिक बाबीसंदर्भात अटी व ठेकेदारांची क्षमता विचारात घेवून एका कंत्राटदारास दोनपेक्षा जास्त क्लस्टरची कामे न देण्याबाबतची अट शिथिल करण्याबाबतचा निर्णय घेण्यास जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. मात्र, असे करीत असताना निविदेच्या मूळ गाभ्यात फरक पडणार नाही, याबाबतची दक्षता समितीने घ्यावयाची आहे. |
| २२. | शासन परिपत्रक क्र.मफुअ-२०१६/प्र.क्र.६८/जल-७, दि.०४/०५/२०१६ | नाला खोलीकरण / रुंदीकरणाबाबत, डोह यामधील गाळ काढणे याबाबत तपशिलवार मार्गदर्शक सूचना मुख्य अभियंता, लघु सिंचन जलसंधारण, महाराष्ट्र राज्य पुणे व मुख्य अभियंता विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम नागपूर यांनी एकत्रिपणे व Deep CCT करणे, शेततळी, याबाबत तपशिलवार मार्गदर्शक सूचना संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांचेकडून निर्गमित करण्यात याव्यात. |
| २३. | शासन परिपत्रक क्र.जलशि-२०१६/प्र.क्र.६२६/जल-७, दि.२०/०९/२०१६ | शास्त्रोक्त पध्दतीने गावे निवड करण्यासाठी मार्गदर्शक सूचना ठरविण्याकरिता Working Group स्थापन करण्याबाबत. |
| २४. | शासन परिपत्रक क्र.जलशि-२०१६/प्र.क्र.५७४/जल-७, दि.२६/१०/२०१६ | सन २०१७-१८ पासून निवडण्यात आलेल्या गावांना व त्या गावांच्या कृती आराखड्यांना दि. १ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या तालुकास्तरीय आढावा व समन्वय समितीची मान्यता घेण्यात यावी. तद्नंतर आराखडे जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेण्यास सादर करण्यात यावेत. |

| | | |
|---|---|---|
| २५. | शासन निर्णय क्र.जशिअ-२०१६/ प्र.क्र.३६१/जल-७, दि.३१/१२/२०१६ | क वर्ग नगर पंचायती क्षेत्रातील विकास आराखडयानुसार केवळ कृषी / शेती वापरासाठी राखीव करण्यात आलेले क्षेत्र विचारात घेऊन अशा क्षेत्राचा पाणलोट विकास धर्तीवर व माथा ते पायथा या तत्वावर जलयुक्त शिवार अभियानातंर्गत जलसंधारणाच्या / मृदसंधारणाच्या विविध योजना अभिसरणाद्वारे एकात्मिकरित्या राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. जलयुक्त शिवार अभियान राबविण्या संदर्भात वेळोवेळी विविध प्रयोजनार्थ घेण्यात आलेले निर्णय सदर क वर्ग नगरपालिका क्षेत्रात योजना राबविण्या संदर्भात लागू राहतील. |
| २६. | मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव यांचे पत्र क्र. जशिअ-२०१६/प्र.क्र.६५४/जल-७ दि.१/२/२०१७ | जिल्हाधिकारी ठाणे, रत्नागिरी, सातारा, सांगली, कोल्हापुर व पश्चिम विदर्भातील तिव्र दुष्काळ असलेले बुलढाणा व वाशिम व नागपूर विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी अत्यंत अपुरा निधी जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिला आहे. त्यांची ही कृती असमाधानकारक आहे. त्यामुळे जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या पुढील बैठकीमध्ये पुनर्नियोजनाद्वारे ३१ मार्च २०१७ पर्यंत पूर्ण निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात यावी. याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांनी जिल्हा आढावा बैठकीत समक्ष सूचना दिल्या आहेत. |
| २७. | शासन निर्णय जलसंपदा विभाग क्र.मेरीना-२०१४/प्र.क्र.१८२/ १४/लाक्षेवि (आस्था), दिनांक ४ मे २०१७ | राज्यातील मोठ्या पाटबंधारे प्रकल्पातून गाळ व गाळमिश्रीत वाळू/रेती निष्कासनाबाबतचे धोरण. |
| २८. | शासन निर्णय क्र. गामुध-२०१७/प्र.क्र.१३४/जल-१, दिनांक ६ मे, २०१७ व दिनांक १५ मे, २०१७ | जलसंधारण विभाग-गाळ मुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्याबाबत. |
| २९. | शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१३४/जल-१, दिनांक १६ मे, २०१७ , २३ मे, २०१७ | जलसंधारण विभाग-गाळ मुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत इंधनाकरिता निधी वितरणाची कार्यपध्दती. |
| ३०. | शासन पत्र क्रमांक: जशिअ-२०१७/प्र.क्र. २४७/ जल-७, दि. १६ मे. २०१७ | जलयुक्त शिवार अभियानाचे आराखडे तयार करताना प्रत्येक स्तरावर (गाव, तालुका, जिल्हा) यथार्थदर्शी आराखडयानुसार यापुर्वी पाणलोटात झालेली कामे विचारात घेणे, जुन्या अस्तितत्वात असलेल्या कामांची |

| | | |
|---|---|---|
| | | उपयुक्तता कमी झाली असल्यास दुरूस्ती प्रस्तावित करणे इ. बाबींची पडताळणी करून सन २०१६-१७ चे आराखडे तपासुन सुधारीत करणे व सन २०१७-१८ चे आराखडे या सूचना विचारात घेवूनच तयार करणे. |
| ३१. | शासन पत्र क्रमांक :- जशिअ २०१७/प्र.क्र. २३३/जल-७, दि. २० मे, २०१७. | जलयुक्त शिवार अभियान व जलसंधारणाची अन्य कामे करताना सर्व यंत्रणांनी मृद व जलसंधारणाची कामे मजूरांच्या सहाय्याने करण्याबाबत जलसंधारण विभागाने निर्गमित केलेले दि. १० ऑक्टोबर, २०१३ व मशीनद्वारे कामे करण्याबाबत निर्गमित केलेले दि. १५ ऑक्टोबर, २०१३ नुसार आर्थिक मापदंडाचाच अवलंब करण्याबाबत. |
| ३२. | शासन पत्र क्रमांक:-जशिअ-२०१७/प्र.क्र.२४८/जल- ७, दि. २० मे, २०१७. | जलसंधारण विभागातंर्गत सिमेंट नाला बांध व इतर जलसंधारणाच्या कामांच्या अंदाजपत्रकीय दर पृथ्थकरणासाठी जलसंपदा विभागाची सन २०१३-१४ चो दरसूची वापरण्यात यावी. |
| ३३. | शासन पत्र क्रमांक :- सिनाबा-२०१७/प्र.क्र. २५७/जल-७ दि. २३ मे, २०१७. | मातीची होणारी धूप थांबवणे व नाल्यामध्ये गाळ जमा होऊ नये याकरीता गाव आराखडयातील क्षेत्र उपचाराची कामे (Area Treatment) ची कामे ७०% पूर्ण झाल्यानंतर सिमेंट नाला बांधचे कामे हाती घेण्याबाबत. |
| ३४. | शासन पत्र दिनांक २५.५.२०१७ | जलयुक्त शिवार मधील किंवा इतर जलसंधारण, मृदसंधारणाची कामे शासन व खाजगी संस्था, जनतेचा सहभाग तत्त्वावर करणे. |
| ३५. | शासन परिपत्रक क्र.गामुध-२०१७/ प्र.क्र. ६२/जल-८,<br>दिनांक २५.५.२०१७ | गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या कार्यक्रमांतर्गत गाळ काढण्यासाठी खाजगी व्यक्ती, अशासकीय संस्था, ग्रामपंचायती यांनी यंत्रसामुग्री उपलब्ध केल्यास त्यांना द्यावयाचे इंधनाचे दर निश्चित करण्याबाबत. |
| ३६. | शासन निर्णय क्र. गामुध-२०१७/प्र.क्र.१३४/जल-२०,<br>दि.१५ जून, २०१७ | गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्यासाठी विभागीय सनियंत्रण समिती स्थापन करण्याबाबत. |
| ३७. | शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग, क्र. सासिब २०१४/प्र.क्र.२०९/जल-७,<br>दि.२३ जून, २०१७ | सिमेंट कॉंक्रीट नाला बांधाच्या भौतिक व आर्थिक मापदंडाबाबत एकत्रित मार्गदर्शक सुचना. |
| ३८. | शासन पत्र क्र. : जशिअ २०१७/प्र.क्र.३२२/जल- ७, दि. २९ जून, २०१७ | जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१७-१८ या वर्षी निवडलेल्या गावामधील कृती आराखडा करताना कामांचा प्राधान्यक्रम ठरविण्याबाबत. |

| | | |
|---|---|---|
| | | १. दुरुस्ती + क्षेत्र उपचार + लोकसहभाग प्रमाण किमान ७० % पेक्षा कमी होणार नाही व<br>२. सिमेंट नाला बांध + को.प.बंधारा कामे प्रमाण कमाल ३०% पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत. |
| ३९. | शासन पत्र क्र : जशिअ २०१७/प्र.क्र.३७१/जल- ७. दि. १३ जुलै, २०१७. | सन २०१७-१८ या वर्षाकरिता निवडण्यात आलेल्या गावातील कामकाजाचे नियोजन करण्याकरिता कालबध्द कार्यक्रमानुसार कार्यवाही करण्याबाबत. |
| ४०. | शासन पत्र क्र : जशिअ २०१७/प्र.क्र.३५० (भाग-१)/जल-७. दि. २४ जुलै, २०१७.<br><br>कृषि आयुक्तालय<br>जावक क्र : मृदसं/जलयुक्त शिवार अभियान/प्रशिक्षण/मृद- २/१३२९, दि. २७/ ७/२०१७ | जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत सन २०१७-१८ या वर्षासाठी निवडलेल्या गावांमधील पाणलोट प्रकल्प आराखडा तयार करणे व अंमलबजावणीच्या अनुषंगाने निवडलेल्या गावातील अशासकीय सदस्य-३ (सरपंच, महिला प्रतिनिधी, ग्राम कार्यकर्ता/ शेती मित्र/जलसेवक/प्रगतीशील शेतकरी/पुरस्कार प्राप्त शेतकरी यामधून) व गावाशी संबंधित शासकीय क्षेत्रीय कर्मचारी-२ (कृषि सहाय्यक व ग्राम सेवक) असे एकूण ५ प्रशिक्षणार्थी प्रती गांव यांचे ३ दिवस कालावधीचे निवासी प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत प्रशिक्षणाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबत. |
| ४१. | कृषि आयुक्तालय जावक क्र : मृदसं/जशिअ/मृद- २/१४०३. दि. २/८/२०१७ | संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यालयाच्या स्तरावरुन ग्रामस्तरीय पाणलोट विकास आराखडयामध्ये पाण्याचे अंदाजपत्रक तयार करणेबाबत निर्गमित मार्गदर्शक सूचना. |
| ४२. | कृषि आयुक्त जावक क्र. मृदसं/जशिअ/मृद- २/१४४४, दि. ३/८/२०१७ | संचालक, मृदसंधारण, पुणे यांनी निर्गमित केलेल्या उपचार क्षमता नकाशा (Treatment Potential Map) बाबतच्या मार्गदर्शक सूचना. |
| ४३. | शासन पत्र, क्रमांक: जशिअ-२०१७/प्र.क्र.४१५/जल-७,दि.४/८/२०१७ | गाव आराखडे तयार करणबाबत व अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना |
| ४४. | शासन परिपत्रक, क्रमांक: संकीर्ण-२०१७ /प्र.क्र.२४/जल-२०, दि.४/९/२०१७ | जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नाला खोलीकरण/रुंदीकरणाच्या लोक सहभागातून होणाऱ्या कामांकरिता ग्रामपंचायत, खाजगी व्यक्ती, अशासकीय संस्था यांनी यंत्रसामुग्री उपलब्ध केल्यास त्यांना द्यावयाचे दर निश्चित करण्याबाबत. |
| ४५. | शासन पत्र क्र. जशिअ - २०१७/प्र.क्र.४१५/जल-७, दि.११/९/२०१७ | जलयुक्त शिवार अभियान- सन २०१७-१८ या वर्षाकरिता अंमलबजावणीकरिता सूचना |

| | | |
|---|---|---|
| ४६. | शासन परिपत्रक, क्रमांक: संकीर्ण-२०१७ /प्र.क्र.२४/जल-२०, दि.२८/९/२०१७ | जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नाला खोलीकरण/रुंदीकरणाच्या लोक सहभागातून होणाऱ्या कामांकरिता ग्रामपंचायत, खाजगी व्यक्ती, अशासकीय संस्था यांनी यंत्रसामुग्री उपलब्ध केल्यास त्यांना द्यावयाचे दर निश्चित करण्याबाबत. |
| ४७. | शासन निर्णय, क्रमांक जशिअ - २०१६/प्र.क्र.३२३/जल-७ दि.१०/१०/२०१७ | जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवडण्यात आलेल्या गावांचा "जलपरिपूर्णता अहवाल" (Exit Protocol) अंतिम करण्याच्या कार्यपध्दतीबाबत. |
| ४८. | शासन पत्र क्र. लपायो-२०१७ / प्र.क्र. २२६ /जल-१ दि.१७/१०/२०१७ | जलयुक्त शिवार अभियान अतंर्गत घ्यावयाच्या वर नमूद उपचाराच्या दुरुस्तीच्या कामांसदर्भात दुरुस्तीवरील खर्च हा अशा उपचाराच्या नविन कामाच्या प्रचलित आर्थिक मापदंडाच्या कमाल २० टक्के पेक्षा अधिक असणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ४९. | शासन पत्र क्र. लपायो - २०१७/प्र.क्र.२२६/जल-१, दि.१/११/२०१७ | दुरुस्तीच्या कामासंदर्भात सूचना-एका प्रकल्पाच्या संपुर्ण दुरूस्तीचे एकच अंदाजपत्रक तयार करण्यात यावे व दुरुस्तीच्या कामाचे भाग करण्यात येवु नयेत. ज्या प्रकल्पांना पुर्ण होवुन १० वर्ष किंवा अधिक कालावधी झालेला आहे, असे प्रकल्प आवश्यकतेनुसार दुरूस्तीसाठी पात्र ठरविण्यात यावेत. एकदा दुरुस्त करण्यात आलेल्या प्रकल्पांकरीता किमान पुढील ५ वर्षे दुरुस्ती अनुज्ञेय असणार नाही. सर्व साधारणपणे स्थापत्य कामांमध्ये माती व मुरुमासाठी वहन अंतर (Lead) हे एक कि.मी. पर्यंत असावे. को. प. बंधारा दुरुस्ती काम पूर्ण होण्यापुर्वी 'पाणी वापर संस्था स्थापन करण्यात यावी. |
| ५०. | शासन परिपत्रक क्रमांक : जशिअ-२०१७/प्र.क्र.३६४/जल-७ दि.२/११/२०१७ | राज्यात जलयुक्त शिवार अभियान किंवा मृद व जलसंधारणाची इतर कामे शासन, खाजगी संस्था व जनतेचा सहभाग (PPP). तत्वावर करण्यासंदर्भात खाजगी/अशासकीय संस्था यांना शासनाच्या सहभागाने काम करावयाचे असल्यास संस्थांचा /लोकसहभागासह किमान सहभाग ४५ टक्के व उर्वरीत कमाल ५५ टक्के सहभाग राज्य शासनाचा असेल. |
| ५१. | शासन निर्णय क्रमांक: जलअ-२०१४/प्र.क्र. २०३/ जल-७, दि.२/११/२०१७ | जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१७-१८ या वर्षापासून निवडलेल्या गावांचा पाण्याचा ताळेबंद करताना तसेच गावाचा कृती आराखडा करताना केवळ गावाचे भौगोलिक क्षेत्र विचारात घेण्याऐवजी निवडलेल्या गावांचे पाणलोट क्षेत्र विचारात घेऊन अभियानाची अंमलबजावणी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| ५२. | शासन परिपत्रक क्रमांकः जशिअ - २०१७/ प्र.क्र. ४८२/जल-७ दि.७/११/२०१७ | जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांमध्ये कंत्राटदाराने निविदा करारातील/ निविदा सुचनेतील अटी व शर्तीचे पालन न केल्यास, कामात कसूर केल्यास, काम निकृष्ट दर्जाचे केल्यास अथवा मुदतीत काम सुरु न केल्यास अशा कंत्राटदारावर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम क्र. संकीर्ण /०५/०६/ प्र.क्र.५३ ईमा २/ दिनांक २८.९.२००६ नुसार दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीस देण्यात येत आहेत. |
| ५३. | शासन शुध्दीपत्रक क्रमांक : जशिअ-२०१६/प्र.क्र.३२३/जल-७ दि.२४/११/२०१७ | ८ (अ). मृद व जलसंधारण कामाकरीता प्राप्त होणाऱ्या निधीमध्ये विविध बक्षिसे, CSR निधी, लोकसहभाग, ग्रामपंचायत निधी, वित्त आयोगाचे अनुदान, यापूर्वी राबविलेल्या नदी खोरे प्रकल्प राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम, पश्चिम घाट विकास योजना व इतर सर्व पाणलोट विकास योजनावरील पाणलोट विकास निधी/ श्रमदानाची रक्कम (Watershed Development Fund) व इतर योजनेतील अनुज्ञेय रक्कम जमा करावी.<br><br>याकरीता सरपंच व ग्रामसेवक यांचे नावे असलेले स्वतंत्र बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यात यावे. शासन स्तरावरुन प्राप्त प्रोत्साहन अनुदानापोटी प्राप्त रक्कम सुध्दा याच खात्यामध्ये जमा करावी. या खात्यामधून मृद व जलसंधारणाच्या देखभाल दुरुस्ती व नविन कामाकरीता रक्कम ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या मान्यतेने खर्च करावी. |
| ५४. | शासन पत्र क्रमांक : जशिअ - २०१७/प्र.क्र. ५९७/ जल-७, दि.२२/१२/२०१७ | जलयुक्त शिवार अभियान हे मुख्यत्वे अभिसरणाच्या माध्यमातून राबवावयाचे आहे. सबब जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत समाविष्ट असलेली कामे प्रथमतः अभिसरणाच्या माध्यमातून घेणे अभिप्रेत असून जर निधी उपलब्ध होत नसेल तरच विशेष निधीतून घेणे अपेक्षित आहे. |
| ५५. | शासन पत्र क्रमांक :- जशिअ - २०१८ / प्र.क्र.५५/जल-७ दि.३/२/२०१८ | यापुढे Geo Tagging केल्याशिवाय जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे देयक अदा करण्यात येऊ नये.<br><br>अभियानातंर्गत प्रस्तावीत असलेल्या ज्या कामांच्या दुरुस्तीवरील खर्च हा नमूद मर्यादेपेक्षा जास्त होत असेल व अशी कामे गाव जलपरीपुर्ण होण्याच्या दृष्टीने |

| | | |
|---|---|---|
| | | आवश्यक आहे अशा कामाच्या बाबतीत नमुद केल्यानुसार कमाल २०% मापदंडाची मर्यादा त्या कामापुरती शिथील करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीला राहतील.<br>अशा कामांची तीन वेळा निविदा मागवून देखील प्रतिसाद प्राप्त झाला नाही तर अशी कामे विभागातंर्गत करण्याकरीता जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेण्यात यावी व त्यानंतर सदर कामे विभागातंर्गत करण्यात यावीत.<br>या शासन निर्णयातील सूचना संदर्भात पाणलोट क्षेत्र हे मुक्त पाणलोट क्षेत्र म्हणून विचारात घेण्यास हरकत नसावी. तसेच सिमेंट बंधारा आर्थिक निकषामध्ये बसत असेल व गाव जलपरिपुर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यक असेल अशा बंधाऱ्याकरीता भौतिक निकष शिथील करण्याचे अधिकार जिल्हा स्तरीय समितीला राहतील. |
| ५६. | शासन निर्णय क्रमांक- जशिअ २०१७/प्र.क्र. ४२६/जल-७, दि.८/२/२०१८ | जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या वर्षी टंचाईमुक्त करण्यासाठी निवडण्यात आलेल्या गावांच्या समग्र आराखड्यास (Net Planning) जिल्हा स्तरीय समितीची मान्यता देण्यास व त्यानुसार अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यास आणि समग्र आराखड्याची अंमलबजावणी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. |
| ५७. | शासन पत्र क्रमांक- बैठक २०१८/प्र.क्र.७२/ जल-७ दि.१२/४/२०१८ | जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ अंतर्गत ६२०० गावे निवडण्यात आलेली असून, या संदर्भात कालबध्द कार्यक्रम आखून दिलेला आहे.. त्यानुसार कामे सुरु करण्यात येवून दि. ३१ मार्च, २०१९ अखेरपर्यंत सर्व कामे पूर्ण करुन गावे जलपरिपूर्ण करण्यात यावीत. |
| ५८. | शासन परिपत्रक क्रः जशिअ - २०१८/प्र.क्र. १८७/जल-७, दि.२७/४/२०१८ | अशासकीय संस्था नदी /नाला/ओढा खोलीकरण व रुंदीकरण, Deep CCT करणे, शेततळी, डोह यामधील गाळ काढणे इत्यादी बरोबर ढाळीचे बांध बांधणे, कंपार्टमेंट बंडिंग अशी कामे करत आहेत. सबब ढाळीचे बांध बांधणे व कंपार्टमेंट बंडिग या कामांकरिता इंधन/डीझेलच्या खर्चाकरीता अशासकीय संस्थाना निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ५९. | शासन पत्र क्रमांक: जशिअ २०१८/प्र.क्र.२४१/जल-७, दि.४/९/२०१८ | नाला खोलीकरणाचे काम भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या तांत्रिक सल्ल्याने करण्यात यावे. याकरिता नाला खोलीकरण करण्यासाठी स्थळ योग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र भूजल सर्वेक्षण व विकास |

| | | |
|---|---|---|
| | | यंत्रणेकडून घेण्यात यावे.<br>गाव आराखडे तयार करतांना प्रस्तावित क्षेत्र उपचार कामांची अंदाजपत्रके तयार करताना एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमासाठी वापरण्यात येत असलेल्या विहित नमुन्यांचा व मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा. |
| ६०. | शासन परिपत्रक क्र. गेटेड-२०१८/प्र.क्र. २७५/जल-१, दिनांक ५.१२.२०१८ | ० ते १०० हे. सिंचन क्षमतेच्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधारे गेटेड बंधारे यामध्ये ०.५० ते १.५० मी. उंचीपर्यंत संधानकीय पडदी बांधकाम करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना. |
| ६१. | शासन परिपत्रक क्रमांकः जशिअ २०१९/प्र.क्र. १०७/जल-७<br>दि.१७ मे, २०१९ | मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ९ मे, २०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार गाळ काढण्यासाठी CSR अथवा स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून यंत्रसामुग्री उपलब्ध न झाल्यास, अशा ठिकाणी ग्रामपंचायतीने यंत्रसामुग्री उपलब्ध करून दिल्यास त्यांना यंत्रभाड्यासह इंधनासाठी रु २७/- प्रघमी या दराच्या मर्यादेत रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. याकरीता तरतूद जलयुक्त शिवार अभियानासाठी उपलब्ध होणारा विशेष निधीतून लेखाशिर्ष ४४०२ २७८१ खाली उपलब्ध करून देण्यात यावी. सदर प्रति घनमीटर दर दिनांक ३० जून २०१९ पर्यंत लागू राहील गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या कार्यक्रमासंदर्भात वेळोवेळी निर्गमित मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. |
| ६२. | शासन परिपत्रक क्रमांकः जशिअ २०१९/प्र.क्र. १०३ / जल-७<br>दि. १७ मे, २०१९ | लोकसहभागातून नाला खोलीकरणाच्या/ रुंदीकरणाकरिता ग्रामपंचायत, अशासकीय संस्था, खाजगी व्यक्ती यांनी यंत्रसामुग्री उपलब्ध करुन दिल्यास प्रति घन मीटर इंधनासह यंत्रभाडे यासाठी ₹२७/- इतका कमाल दर दि.४/९/२०१७ अन्वये निश्चित करण्यात आला होता. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ९ मे. २०१९ रोजी झालेल्या बैठकीत प्रति घेऊन प्रति घन मीटर दर ₹३० अशी वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार प्रति घन मीटर १३० एवढा कमाल दर सदर परिपत्रक निर्गमित केलेल्या दिनांकापासून लागू करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. |